**ANNUAL GENERAL MEETING**

**Day & Date**: Wednesday, 28th September, 2022

**Time**: 11:00 A.M. (IST) (Meeting started at 11:10 A.M.)

**Mode and Deemed Venue:** Through Video Conferencing Facility (ZOOM), At post Pimpali, Tal. Baramati, Dist. Pune – 413102

**Corporate Participants:**

1) Mr. Rajendra D. Pawar: Chairman and Managing Director
2) Mr. Rohit R. Pawar: Whole-Time Director
3) Mr. Subhash J. Gulve: Director
4) Mr. Subhash M. Kore: Chief Financial Officer
5) Mr. Devendra V. Kulkarni: Company Secretary

**Secretarial Auditor**

1. CS Mahesh Risbud.

**Scrutinizer:**

1) CS Hrishikesh Wagh: Partner, KANJ and Co. LLP

• **Welcome Address – Mr. Devendra Kulkarni:**

नमस्कार, मी देवेंद्र कुलकर्णी, आपल्या बारामती ॲग्रो संस्थेचा कंपनी सेक्रेटरी, या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मीटिंग द्वारे संस्थेच्या ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी जमलेल्या सभासदांचे स्वागत करतो.

आणि आपल्या माननीय चेअरमन साहेबांचे, CEO रोहित दादा यांचे व संस्थेच्या संचालक मंडळातील सदस्य, सुभाष गुळवे आबा यांचे स्वागत करतो.

तसेच संस्थेचे COO, बाबासाहेब सूर्यवंशी सर, आर्थिक सल्लागार, रोहित मेहेंदळे सर, CFO, कोरे सर, संस्थेचे सेक्रेटरिअल ऑडिटर रिसबूड सर आणि या मीटिंग साठी चे स्क्रूटिनाइज़र ह्रिषीकेश वाघ सर यांचे ही स्वागत करतो.

ही सभा कंपनी कायद्याच्या आवश्यक त्या तरतुदींचे पालन करून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेत आहोत.

सभेसाठी आवश्यक असणारी सभासदांची संख्या म्हणजेच कोरम हा उपस्थित आहे. सभेच्या प्रथे प्रमाणे, सभेच्या नोटिशींचे वाचन आपल्यासमोर करत आहे.

**नोटीस**

सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे की, बारामती ॲग्रो लिमिटेड संस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता, झूम मीटिंगच्या ("व्हिडिओ कॉन्फरन्सिंग") माध्यमातून खालील विषय हाताळण्यासाठी घेण्यात येणार आहे.

**सर्वसाधारण विषय**

१) कंपनीचे दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजीचे स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय विवरणपत्र व तसेच संचालकांचा व हिशेब तपासनिसांचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्वीकारणे.

२) ६% प्रेफरेन्स शेअर्स वर लाभांश (डिविडेंड) घोषित करणे.

३) ९% प्रेफरेन्स शेअर्स वर लाभांश (डिविडेंड) घोषित करणे.

४) क्रमपद्धत्तीने निवृत्त होणाऱ्या व पुनःनेमणुकीसाठी संमती दर्शविलेल्या श्री. रोहित रा. पवार (डीआयएन: ००५९०६७९) यांची संचालकपदी नेमणूक करणे.

**विशेष विषय**

५) किंमत लेखपरीक्षकांचा ३१ मार्च, २०२३ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाकरिता मुशाहिरा ठरविणे.

६) श्री. सुभाष ज. गुळवे (डीआयएन: ०२६२५०२२) यांची संचालकपदी पुनःनेमणुक करणे व त्यांचा मुशाहिरा ठरविणे.

७) श्री. राजेंद्र दि. पवार (डीआयएन: ००२२६८४८) यांच्या मुशाहिरा च्या नियमामध्ये बदल करणे.

८) श्री. रोहित रा. पवार (डीआयएन: ००५९०६७९) यांच्या मुशाहिरा च्या नियमामध्ये बदल करणे.

आता, आपले कार्यकारी संचालक, मा. सुभाष गुळवे आबा यांना विनंती करतो की त्यांनी संस्थेचा आर्थिक वर्ष २०२१-२२ चा आढावा सभेसमोर मांडावा.

• **Financial Overview – Mr. Subhash J. Gulve:**

१) भागभांडवल: ३१ मार्च २०२२ अखेर संस्थेचे भागभांडवल रु. ४४ कोटी ६२ लाख आहे. अहवाल वर्षामध्ये, भागभांडवलाच्या पुनर्रचनेमुळे, ५२,४८,६१४ equity shares चे conversion / रूपांतर हे प्रेफरेन्स शेअर्स मध्ये झाले आहे.

२) राखीव निधी: ३१ मार्च २०२१ अखेर, संस्थेचा राखीव निधी रु. ५७४ कोटी ८२ लाख असून मागील वर्षी ४१६ कोटी २६ लाख होता. राखीव निधीमध्ये रु. १५८ कोटी ५६ लाख ने वाढ झालेली आहे.

३) एकूण मालमत्ता: ३१ मार्च २०२२ अखेर, संस्थेची स्थावर मालमत्ता रु. ६३० कोटी ६२ लाख इतकी नोंदली गेली आहे.

४) उलाढाल: ३१ मार्च २०२२ अखेर, संस्थेची एकूण उलाढाल रु. ३२४० कोटी ९३ लाख आहे. तर मागील वर्षीची उलाढाल रु. २०६६ कोटी ७७ लाख होती.

५) घसारा: अहवाल वर्षामध्ये, घसारा रु. ६४ कोटी २३ लाख असून मागील वर्षी रु. ५७ कोटी २५ लाख होता.

६) अहवाल वर्षामध्ये एकूण रु. १७ लाख ७९ हजारांची रोपे देण्यात आली. रु. २ लाख ११ हजारांचे ड्रीप बसवण्यात आले तसेच एकूण रु. २ कोटी ७० लाख ७९ हजारांची खते वाटप करण्यात आली.

७) करारपद्धतीने कुक्कुटपालन या योजनेनुसार आपले संस्थेने एकूण ३,३१६ शेतकऱ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. या शेतकऱ्यांना या वर्षामध्ये जोपासना खर्च (growing charges) म्हणून एकूण रु.६७ कोटी ७४ लाख देण्यात आले आहेत.

यानंतर मी, मा. चेअरमन साहेबांना विनंती करतो की, त्यांनी आपले मनोगत व्यक्त करावे.

• **Chairman's Speech - Mr. Rajendra D. Pawar:**

नमस्कार, आपल्या संस्थेच्या ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे जमलेल्या सर्व सभासद, संचालक मंडळातील सदस्य, संस्थेचे सर्व ऑडिटर्स आणि इतर पदाधिकाऱ्यांचे स्वागत.

आपल्या कंपनी सचिवांनी सांगितल्या प्रमाणे, कंपनी कायद्याच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी, मागील वर्षी प्रमाणे, या वर्षी सुद्धा संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेत आहोत.

आपणांस सांगताना आनंद होतो आहे की आर्थिक वर्ष २०२१-२२ अखेर, संस्थेची आर्थिक उलाढाल ३,२०० कोटी च्या पुढे गेली आहे. ही उपलब्धी, संस्थेशी निगडित असलेल्या सर्वांच्या सहकार्यामुळे आणि योगदानामुळे झाली आहे, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे सर्व स्तरांवर झालेले दुष्परिमाण व अडचणींचा सामना करून आज आपल्या संस्थेने ही उपलब्धी मिळवली आहे. त्यासाठी संस्थेशी निगडित असलेल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

ही यशस्वी वाटचाल, चालू आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये सुरु ठेवण्यासाठी, तसेच संस्थेच्या व्यवसाय वृद्धी व विस्ताराच्या दृष्टीने, आपल्या संस्थेने, पश्चिम बंगाल, आसाम, राजस्थान आणि कर्नाटक या राज्यांमध्ये पोल्ट्री आणि फीड व्यवसाय सुरु केला आहे आणि अल्पावधीतच, सकारत्मक प्रतिसाद मिळत आहे.

मागील वर्षी च्या सभेमध्ये सांगितल्या प्रमाणे, आपल्या संस्थेने, जळगाव जिल्ह्यामधील, चोपडा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, हा कारखाना, १५ वर्षासाठी भाडेतत्वावर चालवण्यासाठी घेतला आहे. आणि चार वर्षे बंद असलेला, हा कारखाना, कमी वेळात सुरु करून, हंगाम २०२१-२२ मध्ये ३ लाख मे टन साखरेचे गाळप केले. त्या भागातील शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद बघता मला विश्वास आहे की येणारा गाळप हंगाम सुद्धा यशस्वी होणार आहे.

अनंत अडचणी असतानाही योग्य मार्गदर्शनाखाली कष्टाने शेती करणारे तरूण शेतकरी असतील तर भविष्यात शेतीला चांगले दिवस निश्चितच येतील हा विश्वास आहे आणि मी सांगू इच्छितो की आपल्याला कोणत्याही प्रकारच्या मार्गदर्शनासाठी, मदतीसाठी, आपली बारामती ॲग्रो, मी, रोहित दादा, गुळवे आबा व इतर मंडळी कायम आपल्या सोबत आहोत.

आपल्या संस्थेच्या सर्व व्यवसायांचा विस्तार वेगाने होत आहे. त्या अनुषंगाने, संस्थेशी निगडित असलेले आपण सर्वजण, आपली भूमिका व जबादारी नुसार आपले योगदान देणार आहात याचा मला विश्वास आहे आणि आपले सहकार्य, विश्वास कायम असावा अशी अपॆक्षा व्यक्त करतो, पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे आभार.

आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी..!!!

- **Voting Instructions – Mr. Devendra Kulkarni:**

चेअरमन साहेबांनी सभेला संबोधित केल्याबद्दल, सर्वांतर्फे, मी त्यांचे आभार मानतो.

ज्यांनी ई-वोटींग मार्फत मतदान केलेले नाही त्यांनी **NSDL** च्या **website** वर जाऊन आपले मतदान नोंदवावे, ई-वोटिंग ची लिंक चॅट बॉक्स मध्ये दिलेली आहे. ई-वोटिंग विषयी अधिक माहिती हवी असल्यास, सभा संपल्यानंतर कृपया शेअर्स डिपार्टमेंट मध्ये संपर्क साधावा.

सभासदांना काही प्रश्न असल्यास त्यांनी ते विचारावे, किंवा मीटिंग नंतर कंपनीच्या शेअर्स डिपार्टमेंट मध्ये संपर्क साधावा.

आजच्या सभेकरिता आपण सर्वजण या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि आजची सभा संपल्याचे जाहीर करतो.

---

**Meeting concluded at: 11:30 A.M.**